दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com   epaper. lokrakshanay.com   dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२४२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, ११ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## एसटी कर्मचारी उपोषणाच्या तयारीत, प्रलंबित आर्थिक मागण्या मान्य न झाल्यास 'काम बंद' आंदोलन करणार



■मुंबई। यश सावंत,

प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी एसटी कर्मचारी उपोषणाच्या तयारीत आहेत. राज्यभरातील एसटी कर्मचारी १३ फेब्रुवारीपासून विभागीय पातळीवर उपोषण सुरू करणार आहेत. तसेच उपोषणानंतरही मागण्या मान्य न झाल्यास आगारपातळीवर 'काम बंद' आंदोलन सुरू करून एसटी सेवा बंद केली जाईल, असा इशारा महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेकडून देण्यात आला आहे.

महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ यांची थकबाकी देण्याबाबत १५ दिवसात मान्यताप्राप्त कामगार संघटनेसमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन निर्णय घेण्याचे सप्टेंबर २०२३ मध्ये मान्य केले होते. परंतु ४ महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही अद्याप बैठक झालेली नाही. त्यामुळे एसटी कामगार प्रचंड संतप्त झाले आहेत. एसटी कामगारांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देणी या मागण्यांवर मान्यताप्राप्त संघटनेसमवेत चर्चा करून समितीने शासनास ६० दिवसात अहवाल सादर करण्याचे मान्य केले आहे. परंतु ६० दिवसांऐवजी ४ महिन्यांचा कालावधी संपूनही अहवाल सादर झालेला नाही.

या सर्व प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी संघटनेने १३ फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषण सुरू करण्याची नोटीस १ जानेवारी रोजी दिली एसटी महामंडळाला होती. या नोटीसची दखल घेऊन १३ फेब्रुवारीपूर्वी संघटनेसमवेत बैठकीचे आयोजन करून आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी शासन पातळीवर पाठपुरावा केला जाईल, असे एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी मान्य केले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रलंबित मागण्यांची पूर्तता न झाल्यास संघटनेच्या नेतृत्वाखाली १३ फेब्रुवारीपासून राज्यातील सर्व विभागीय पातळीवर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल. उपोषणानंतरही राज्य सरकार, प्रशासनाने कोणताही ठोस निर्णय घेतला नाही, तर एसटी सेवा बंद करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला आहे.

## 'लोकसभा निवडणुकीपूर्वी CAA लागू करणार', 'त्या' अल्पसंख्यांकांना नागरिकत्व मिळणार!
### अमित शाह यांची घोषणा



■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाला 370 तर NDA ला 400 हून अधिक जागा मिळतील. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन होईल. लोकसभा निवडणुकीच्या निकालांसंदर्भात कसल्याही प्रकारचे सस्पेन्स नाही. एवढेच नाही, तर आपल्याला पुन्हा विरोधी बाकांवरच बसावे लागणार, असे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनाही लक्षात आले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. ते एका टीव्ही कार्यक्रमात बोलत होते. शाह म्हणाले, 'आम्ही जम्मू-काश्मिरला विशेष दर्जा देणारे घटनेतील कलम 370 रद्द केले आहे. यामुळे आम्हाला वाटते की, देशातील जनता भाजपाला 370 जागा आणि एनडीएला 400 हून अधिक जागांचा आशीर्वाद देईल.

नागरिकत्व सुधारना कायद्यासंर्भात (CAA) बोलताना शाह म्हणाले, 2019 मध्ये कायदा लागू झाला होता. यासंदर्भात नियम जारी केल्यानंतर, लोकसभा निवडणुकीपूर्वी लागू केला जाईल. सीएए हा देशाचा कायदा आहे. याचे नोटिफिकेशन निश्चितपणे होईल. निवडणुकीपूर्वीच सीएए आमलात येईल. यात कुणालाही कंफ्यूजन असायला नको.' 'CAA संदर्भात मुस्लीम बांधवांची दिशाभूल केली जात आहे आणि त्यांना भडकवले जात आहे.

## 'आश्वासन नको, मानधनवाढीचा जीआर काढा', मागणी मान्य होत नाही तोपर्यंत आशासेविका ठाण्यातच मांडणार ठाण!




■ठाणे। सचिन कदम,

वेतन वाढ तसेच विविध प्रलंबित मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात शुक्रवारी राज्यभरातून आलेल्या आशासेविका आणि गटप्रवर्तकांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. यामध्ये केवळ आश्वासन मिळाल्याने आशासेविका आणि गटप्रवर्तकांनी संप सुरूच ठेवण्याची भुमिका घेत जोपर्यंत मागणी मान्य होत नाही तोपर्यंत ठाणे शहर सोडायचे नाही, असा निर्णय घेतला आहे. राज्यातील गटप्रवर्तकांना १० हजार रुपये, आशा स्वयंसेविकांना ७ हजार मानधन आणि त्याचबरोबर २ हजार रुपये दिवाळी भाऊबीज भेट देण्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते. यासंबंधीचा आदेश विनाविलंब काढण्यात येईल, असे आश्वासनही सरकारने दिले होते. परंतु, तीन महिन्याचा कालावधी लोटूनही मानधनवाढीचा शासकीय आदेश काढण्यात आलेला नाही. यामुळे राज्यातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांनी १२ जानेवारी पासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपाला तीन आठवडे होऊनही राज्य सरकारने आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक कर्मचाऱ्यांच्या संपाची दखल घेतलेली नाही. यामुळेच सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांनी शहापूर ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय अशी पदयात्रा काढण्याचा निर्णय घेतला. या यात्रेदरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करत त्यांच्यासमोर विविध समस्यांचे गाऱ्हाणे मांडण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यानुसार शुक्रवारी ही पदयात्रा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आली. यामध्ये राज्यातील विविध भागातील आशा सेविकाही सामील झाल्या. आशासेविका आणि गटप्रवर्तकांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. यामध्ये येत्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. केवळ आश्वासन मिळाल्याने संप सुरूच ठेवण्याची भूमिका घेऊन जोपर्यंत मागणी मान्य होत नाही तोपर्यंत ठाणे शहर सोडायचे नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाचे संघटक सचिव राजेश सिंह यांनी दिली.

## ओल्या-सुक्या कचऱ्याचे घरीच वर्गीकरण करा; पालिकेने नागरिकांना केले आवाहन


महापालिका, महानगर गॅस लिमिटेड यांच्यामध्ये १ हजार टन क्षमतेच्या ओला कचऱ्यापासूनच्या बायोगॅसनिर्मिती प्रकल्पासाठी करार झाला आहे. त्या दिशेने ओला कचरा संकलित करण्यासाठीचा मार्ग आखण्यात आला असून विशेष वाहनांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, ओला कचरा संकलनामध्ये वर्गीकरणाचा मोठा अडथळा आहे. यावर जागृती म्हणून कचरा उत्पत्ती स्थानाच्या ठिकाणीच जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.



■मुंबई। विशाल कारंडे,

मुंबईत कचरा उत्पत्ती म्हणजेच कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणीच ओला-सुका कचरा वर्गीकरणात लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी पालिकेच्या माध्यमातून पुढाकार घेण्यात येणार आहे. यासाठी पालिकेकडून स्थानिक पातळीवर रहिवासी संस्थांच्या परिसरात कचरा वर्गीकरणाबाबत माहिती, शिक्षण आणि संवाद तसेच जनजागृती करण्यात येणार आहे. कचरा वर्गीकरणाचा विषय हाताळण्यासाठी आणि त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी मुंबईकरांमध्ये वर्गीकरणाविषयी जनजागृती व्हायला हवी. याच उद्देशाने पालिकेकडून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत नागरी अभियान २.० अंतर्गत कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणीच त्याचे वर्गीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत माहिती, शिक्षण आणि संवाद आराखडा निश्चित करणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत रहिवासी संस्थांच्या माध्यमातून १ हजार टन इतका जमा होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे, हे घनकचरा व्यवस्थापन विभागासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कचऱ्याच्या उत्पत्तीस्थानाच्या ठिकाणीच वर्गीकरण करण्यासाठी लोकसहभाग वाढवण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. शिंदे यांनी सांगितले. मुंबईतील नागरिकांमध्ये विविध संदेशांच्या भित्तीचित्रांद्वारे आणि उड्डाण पूल, सार्वजनिक ठिकाणे इत्यादींवर सुशोभीकरणाद्वारे जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. त्यात चित्रे, भित्तीचित्रे आदी प्रकार समाविष्ट असतील.

## दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्याचे सुशोभीकरण करण्याची पर्यटक व स्थानिकांची मागणी




■श्रीवर्धन। भावना जैन,

तालुक्यातील दिवेआगर समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य पर्यटकांवर नेहमीच भुरळ घालत आहे. मात्र, येथील किनारा अद्याप परिपूर्ण विकसित करण्यात आलेला नाही. किनाऱ्यावर पर्यटनदृष्ट्या आधुनिक सुविधांबरोबरच सुशोभीकरण करण्याची मागणी पर्यटक व स्थानिकांतर्फे होत आहे. दिवेआगरला निसर्गसौंदयाचे वरदान लाभलेले आहे. या सुवर्णभूमीला पर्यटनाबरोबर येथील सुवर्ण गणपतीमुळे धार्मिक स्थळाचे वैभव प्राप्त झाले आहे. त्यामुळे येथील स्वच्छ व सुरक्षित समुद्रकिनारी नेहमीच मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे. मात्र, येथील किनाऱ्यावर पर्यटनदृष्ट्या कोणत्याही सोयीसुविधा करण्यात आलेल्या नाहीत. येथे बसण्यासाठी साधी आसनांचीदेखील सोय करण्यात आलेली नाही; तर दिवाबत्ती नसल्याने संध्याकाळी किनाऱ्यावर अंधाराचे साम्राज्य निर्माण होते. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे. येथील सुंदर समुद्रकिनारा न्याहाळण्यासाठी बैठकासोबतच पथदिव्यांची सुविधा करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शिवाय श्रीवर्धनच्या धर्तीवर दिवेआगरचा विकास होणे अपेक्षित आहे. नुकतेच दिवेआगर समुद्रकिनारी धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे.

## आता गिरणी कामगार स्वस्थ बसणार नाहीत; विधानभवनावर महामोर्चा नेणार

■मुंबई। विशाल पाटील,

गिरणी कामगार घरांच्या प्रश्नावर आता स्वस्थ बसणार नाही आणि सरकारलाही स्वस्थ बसू देणार नाही. येत्या 28 तारखेला गिरणी कामगार आपल्या कुटुंबियांसमवेत राज्यव्यापी महामोर्चा काढून सरकारला आपली ताकद दाखवून देतील, अशी ग्वाही राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष, शिवसेनेचे उपनेते आमदार सचिन अहिर यांनी लालबाग भारतमाता येथे आयोजित गिरणी कामगारांच्या आंदोलनात बोलताना दिली. गिरणी कामगार घरांच्या प्रश्नावरील दिरंगाई आणि गिरण्यांच्या चाळींच्या पुनर्बांधणीवर चालढकलपणा करणा-या शासनाला जाग आणण्यासाठी गिरणी कामगार कृती संघटनेच्या वतीने लालबाग,



भारतमाता सिनेमागृह येथे गिरणी कामगारांचे धरणे आंदोलन समन्वयक जयश्री खाडिलकर पांडे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, महाराष्ट्र गिरणी कामगार युनियन आणि सेंच्युरी मिल कामगार एकता मंच यांच्या कामगार संघटना कृती समितीच्या वतीने हे आंदोलन आयोजित करण्यात आले.

तर एनटीसी चाळ रहिवाशी कृती समिती आणि खाजगी गिरणी चाळ रहिवाशी मंडळ यांनी आंदोलनात सहभागी होऊन गिरणी कामगार लढ्याला संघर्षाची धार आणली होती. या प्रसंगी उबाठा शिवसेनेचे आमदार अजय चौधरी, नगरसेवक अनिल कोकीळ यांनी आपल्या भाषणात गिरणी कामगारांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. तर येत्या 26 तारखे पासून राज्याचे अल्पकालीन अधिवेशन पार पाडणार असून हीच संधी साधून हा महामोर्चा काढण्यात येणार आहे. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कामगार चळवळीसाठी वेचले आहे त्यांना राज्य सरकार कडून संनियंत्रण समितीवर घेण्यात आले नाही, यावर आसूड ओढून सचिन अहिर आपल्या भाषणात पुढे म्हणाले, पात्रता निश्चिती हा कामगारांची दिशाभूल करण्याचा प्रकार आहे.

त्याद्वारे सरकारचा घरे कमी करण्याचा डाव असून त्या विरुद्ध आता कामगारांना अधिक संघटित व्हावे लागेल. गिरण्यांच्या चाळीच्या पुनर्बांधणीच्या प्रश्नावर आपली दिल्लीमध्ये सचिव पातळीवर बैठक झाली असून, हा प्रश्नही आम्ही लावून धरला आहे. तो तडीस नेल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असेही सचिन अहिर म्हणाले.

## थरारक पाठलागानंतर व्हेल माशाच्या उलटीसह चौघांना अटक, वनविभागाची कारवाई



■रत्नागिरी। योगेश होळंब,

राजापूरात वनविभागाच्या पथकाने थरारक पाठलाग करत व्हेल माशाची उलटी प्रकरणी तसेच तस्करी करणाऱ्या चौघांना पकडले. या चौघांवर राजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. न्यायालयाने चार संशयितांना 16 फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावल्याची माहिती वन विभागातील अधिकारी यांनी सांगितले. वनविभागास काही जण व्हेल माशाची उलटी विकण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर वनविभागाने राजापूर तालुक्यातील ताम्हाणे-पाचल रस्त्यावर सापळा रचला. या सापळ्यात संशयित अलगद सापडले. वन विभाग आणि पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार राजकुमार सुरेश शेलार (नांदीवली, कल्याण पूर्व), आकाश राजेद्र घाडगे (सानपाडा), रुपेश गणपत (आवरे, रायगड) आणि जगदीश पोतदार (पाचल, राजापूर, रत्नागिरी) यांना व्हेल माशाच्या उलटी प्रकरणात अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने चौघांना १६ फेब्रुवारी पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेत. ही कारवाई विभागीय वनअधिकारी दीपक खाडे व सहायक वनसंरक्षक वैभव बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी जिल्ह्यात करण्यात आली.

## पुण्यात कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ५७१ बुलेटस्वारांवर कारवाई

■पुणे। अभिजित येरल्लू,

वाहतूक नियम मोडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा बेशिस्त चालकांमुळे वाहतूक कोंडी, तसेच अपघातांचे धोके वाढले आहेत. विशेषतः बुलेटच्या सायलेन्सरमध्ये मॉडिफाइड करून कर्णकर्कश आवाज करीत फिरणाऱ्या बुलेटस्वारांची संख्या वाढत आहे. यातून ध्वनी प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे पुणे शहर वाहतूक पोलिसांनी दोन दिवसांत तब्बल ५७१ बुलेटवर कारवाई केली. वाहतूक पोलिसांनी येरवडा वाहतूक पोलिस कार्यालय येथे जप्त सायलेन्सरवर बुलडोझर फिरवला. यापुढेदेखील कारवाई सुरू राहणार असून, यापुढे सायलेन्सरमध्ये मॉडिफाइड करून कर्णकर्कश आवाज कराल तर खबरदार, असा इशारा वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी दिली शुक्रवारी पत्रकार



परिषदेत दिला. आता वाहतूक शाखा ॲक्शन मोडवर आली असून, विविध प्रकारचे नियमभंग करणाऱ्यावर कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालय परिसरातून जात असताना याचा सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच, ध्वनी प्रदूषणात मोठी वाढ होते. या सर्व पार्श्वभूमीवर शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी मागील दोन दिवसांत शहरात विशेष मोहीम राबविली.

## वसई, विरारमधील आरएमसी प्रकल्पांवर कारवाई, बंद करण्याचे सहा प्रकल्पांना आदेश

■वसई। दिगंबर जाधव,

वसई, विरारमध्ये काही ठिकाणी सुरू असलेले आरएमसी प्रकल्प मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण करीत आहेत. या प्रकल्पांच्या विरोधात आता महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मालजीपाडा येथील मेसर्स एन. जी. प्रकल्प बंद करण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत. तर इतर सहा प्रकल्पांना प्रदूषण रोखण्याच्या नियमांचे पालन करण्यासंदर्भात नोटिसा बजावल्या आहेत. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीटचे आरएमसी प्रकल्प उभारण्यात आले आहेत. यातून दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहने



ये-जा करतात. मात्र हे प्रकल्पमालक पर्यावरणाच्या दृष्टीने कोणतेच नियम पाळत नाहीत. प्रदूषण रोखण्याची यंत्रणा नसल्याने कारखान्यांतून सतत धुळीचे प्रदूषण होते. ही सर्व धूळ थेट महामार्गावर येते. प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता ढासळून नागरी आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. प्रदूषणकारी प्रकल्पांवर कारवाईची मागणी नागरिकांमधून करण्यात येत होती. अखेर मंडळातर्फे कारवाई करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. नुकताच मालजीपाडा येथील मेसर्स एन. जी. प्रोजेक्टस हा कारखाना प्रदूषण नियमांचे उल्लंघन करून चालविला जात असल्याचे प्रदूषण मंडळाच्या निदर्शनास आले आहे. हा कारखाना सीलबंद करावा यासाठी मंडळाने वसई-विरार महापालिकेला कारवाईच्या सूचना केल्या आहेत. याशिवाय ज्या कारखान्यात उत्पादन करीत असताना प्रदूषण रोखण्यासाठीच्या ज्या उपाययोजना आहेत त्या केल्या जात नाहीत अशा प्रकल्पांना नोटिसा बजावण्याचे काम सुरूच आहे. आतापर्यंत सहा प्रकल्पांना उपाययोजना करण्याच्या संदर्भात नोटिसा दिल्या आहेत तर दोन प्रकल्पांच्या नोटिसा प्रस्तावित आहेत, अशी माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात आली आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग वसई, विरारमधून जातो. या महामार्गा लगतचा हिरवागार परिसर आहे. मात्र या प्रकल्पातून सतत उडणाऱ्या धुळीने येथील निसर्गरम्य परिसराची धूळधाण होऊ लागली आहे. अनेक हिरवी झाडेही धुळीने भरली आहेत.

प्रदूषण पसरविणाऱ्या प्रकल्पांवर कारवाई सुरू आहे. नुकताच एक प्रकल्प बंद करण्यासाठी पालिकेला पत्र दिले आहे. याशिवाय प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने उपाययोजनेसाठी सहा प्रकल्पांना नोटिसा बजावल्या आहेत.

# यूपीआय स्कॅम म्हणजे काय? कसे जाळ्यात अडकतात लोक? बचाव कसा करायचा जाणून घ्या

वेगवेगळ्या मार्गांनी युजर्सना फसवून त्यांच्याकडून युपीआयद्वारे पैसे मिळवणे किंवा युजर्सचा पिन, पासवर्ड इत्यादी संवेदनशील

दिवसेंदिवस आपल्या डिजिटल ट्रँजॅक्शनची संख्या वाढत आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस म्हणजे युपीआय सोप्या युजर इंटरफेस आणि सहज होणाऱ्या फंड ट्रान्सफरमुळे ही पद्धत आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनू लागली आहे. परंतु याचा एक दुष्परिणाम देखील आहे तो म्हणजे यातून होणारी फसवणूक...म्हणजेच युपीआय स्कॅम!

युपीआय स्कॅम म्हणजे काय?

युपीआय स्कॅम म्हणजे फसव्या मार्गाने युजर्सची संवेदनशील माहिती मिळवणं किंवा अनधिकृत अकाऊंट्सवर पैसे पाठवणे.

युपीआय स्कॅम कशाप्रकारे होतो

स्कॅमर अधिकृत युपीआय ॲप्स किंवा सर्व्हिस प्रोव्हायडरसारख्या दिसणाऱ्या फेक वेबसाइट, ई-मेल्स किंवा एसएमएस बनवतात. ते धोकादायक लिंकवर युजर्सना क्लिक करण्यास किंवा फसव्या प्लॅटफॉर्मवर युपीआय पिनमी पासवर्ड किंवा ओटीपी टाकण्यास भाग पाडतात.

फेक रिक्वेस्ट : एखादा मित्र, नातेवाईक किंवा कस्टमर सर्व्हिस रिप्रेझेंटिव्ह बनून स्कॅमर युजर्सच्या अकाऊंट्सवर रिक्वेस्ट पाठवतात. एखादी इमर्जन्सी आहे, असं सांगून किंवा लालूच दाखवून रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करण्यास भाग पाडतात.

स्क्रीन मिररिंग ॲप्सः टेक्निकल सपोर्ट देण्याच्या नावाखाली स्कॅमर्स युजर्सना त्यांच्या डिव्हाइसवर स्क्रीन मिररिंग ॲप डाऊनलोड करायला सांगतात. या ॲप्सच्या मदतीनं स्कॅमर्स युजर्सच्या डिव्हाइसवर नियंत्रण मिळवतात, ज्यात युपीआय ॲप्सचादेखील समावेश असतो, ज्यावर अनधिकृत ट्रँजॅक्शन केले जातात.

फिशिंग : आपण बँक रिप्रेझेंटेटिव्ह, युपीआय सर्व्हिस प्रोव्हायडर किंवा सरकारी संस्थेतून बोलत असल्याचं स्कॅमर्स युजरला सांगतात. ते युजरकडून संवेदनशील माहिती काढून घेतात किंवा एखादा इश्यू सोडवण्यासाठी पैसे ट्रान्सफर करवून घेतात.




### युपीआय स्कॅमपासून कसं वाचायचं

- कधीही तुमचा युपीआय पिन, पासवर्ड किंवा ओटीपी कोणाजवळ शेअर करू नका.
- कोणत्याही लिंकवर क्लिक करण्यापूर्वी किंवा तुमचे क्रीडेन्शियल्स टाकण्यापूर्वी युआरएल खरा आहे का ते चेक करा.
- जर तुम्हाला अनोळखी व्यक्तीकडून पैसे पाठवण्याची रिक्वेस्ट आली तर सावध व्हा. रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करण्यापूर्वी ओळख पटवून घ्या.
- स्कॅमर नेहमीच एखादी अडचण असल्याची किंवा लालूच दाखवून आपल्याला फसवतात. अशावेळी ट्रँजॅक्शन करण्याची घाई करू नका.

## दिनविशेष

**११ फेब्रुवारी**


- ६६०: सम्राट जिम्मु यांनी जपानचे राष्ट्र निर्माण केले.
- १६६०: औरंगजेबाने मुख्तारखान याला दख्खनची जबाबदारी देऊन औरंगाबाद येथे पाठवले.
- १७५२: पेनसिल्व्हानिया हॉस्पिटल या अमेरिकेतील पहिल्या हॉस्पिटलचे बेंजामिन फ्रँकलिनच्या हस्ते उद्घाटन झाले.
- १८१८: इंग्रजांनी अजिंक्यतारा किल्ला ताब्यात घेतला.
- १८२६: लंडन विद्यापीठाची स्थापना.
- १८३०: मुंबईचे हंगामी राज्यपाल सर सिडने ब्रेकनिथ यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन ॲग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना झाली.
- १९११: हेन्री पिके याने हंटर जातीच्या विमानातून भारतातील पहिली एअर मेल अलाहाबादवरुन नैनी या १० किलोमीटर अंतरावरील गावाला वाहून नेली.
- १९२९: पोप पायस (११ वा) आणि बेनिटो मुसोलिनी यांच्यात झलेल्या लॅटेरान ट्रिटी या विशेष करारानुसार व्हॅटिकन सिटी हे शहर राष्ट्र इटालीतुन वेगळे करण्यात आले.
- १९७९: पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अंदमान निकोबार बेटावरील सेल्युलर जेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले.
- १९९०: २७ वर्षांच्या तुरुंगवासानंतर नेल्सन मंडेला यांची तुरूंगातुन सुटका.
- १९९९: मध्यप्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा लता मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध संगीतकार इलियाराजा यांना जाहीर.
- १८००: छायाचित्रणकलेचा पाया घालणारे हेन्री फॉक्स टॅलबॉट यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १८७७)
- १८३९: अमेरिकन संशोधक अल्मोन स्ट्राउजर यांचा जन्म. (मृत्यू: २६ मे १९०२)
- १८४७: अमेरिकन संशोधक आणि उद्योजक थॉमस अल्वा एडिसन यांचा जन्म. (मृत्यू: १८ ऑक्टोबर १९३१)
- १९३७: ऑस्ट्रेलियन क्रिकेटर बिल लॉरी यांचा जन्म.
- १९४२: कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री गौरी देशपांडे यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च २००३)
- १६५०: फ्रेन्च तत्त्वज्ञ व गणितज्ञ रेने देकार्त यांचे निधन. (जन्मः ३१ मार्च १५९६)
- १९४२: प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक आणि बजाज उद्योगसमुहाचे प्रणेते जमनालाल बजाज यांचे निधन. (जन्मः ४ नोव्हेंबर १८८४)
- १९८६: तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते पण्डित दीनदयाळ उपाध्याय यांची अज्ञात मारेकर्याकडुन हत्या. (जन्मः २५ सप्टेंबर १९१६)
- १९७७: भारताचे ५ वे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांचे निधन. (जन्मः १३ मे १९०५)

# बागेतले औषध गवती चहा

आले आणि गवती चहा घालून केलेला चहा अनेक छोट्या-मोठ्या तक्रारींवरचा रामबाण उपाय आहे. सर्दी, डोकेदुखी, अंगातली बारीक कणकण घालवण्यासाठी हा सर्वोत्तम उपाय म्हणावा लागेल. गवती चहाला पातीचा चहा असेदेखील म्हणतात. याला एक विशिष्ट सुगंध असतो. घाम येऊन तापाचा निचरा होण्यासाठी गवती चहा विशेष गुणकारी आहे. गवती चहा, सुंठ, मिरे आणि दालचिनी यांचा अष्टमांश काढा घेतल्याने सर्दी-पडसे, थंडी वाजून ताप येणे आदी विकार नाहीसे होतात. तापात घाम येण्यासाठी गवती चहाचा वाफारा दिला जातो. हा वाफारा घेतल्यास ताप झटक्यात कमी होतो आणि अंगदुखी थांबते. गवती चहापासून तेलही काढतात. हे तेल संधिवात आणि वाताने अंग दुखण्यावर अत्यंत गुणकारी आहे. हे दुखणे असणाऱ्या व्यक्तींनी सकाळ-संध्याकाळ गवती चहाच्या तेलाने मालीश केल्यास संधिवात बरा होतो, अंगदुखी थांबते. गवती चहा कॉलराचा प्रतिबंध करण्यासाठीदेखील वापरला जातो.



# ओल्या हळदीचे लोणचे



**साहित्य :** ओली हळद - एक वाटी (कापून), आले - अर्धा वाटी (कापून), हिरवी मिरची - अर्धा वाटी, लिंबूरस - अर्धा वाटी, मीठ - चवीपुरते, मोहरी - एक मोठा चमचा, मेथी दाणे - अर्धा चमचा, मोहरी तेल, लोणचे मसाला.

**कृती :** ओली हळद स्वच्छ धुऊन साल काढून त्याचे तुकडे करावे. त्याचप्रमाणे आलेसुद्धा स्वच्छ धुऊन साल काढून त्याचे तुकडे करून घ्यावे. हिरवी मिरची बारीक कापून घ्यावी. बारीक केलेली हळद, आले व मिरची एकत्र करून मीठ, लिंबूरस टाकून मिसळावे. भाजलेली मोहरी व मेथीदाणे यांची जाडसर पावडर करावी. तेल तापवून थंड करावे. चवीप्रमाणे लोणचे मसाला मिळसून इतर सर्व मिश्रणात हे मिसळावे. काचेची बरणी थोडी तापवून हे मिश्रण नंतर त्यात

# पिंपलचा त्रास दूर करण्यासाठी असा करा डाळिंबाचा वापर !

आजकाल तरुणींना ॲक्नेची समस्या वारंवार सतावते. त्वचा लालसर होणे, पिंपल्सचे डाग राहणे, यामुळे सौंदर्य अधिकच बिघडते. अनेकजणींना असे वाटते की चेहऱ्याची स्वच्छता न राखल्यामुळे ॲक्ने येतात. परंतु, हे चुकीचे आहे. खरंतर ॲक्ने येण्याची कारणे वेगळी आहेत. हार्मोन्सचे असंतुलन, ताण, सिबमची निर्मिती, बंद पोर्स, बॅक्टरीया यामुळे ॲक्नेची समस्या उद्भवते. या सगळ्या समस्या असतील आणि



**जळजळ कमी होते :** डाळिंबामध्ये अँटी इन्फ्लामेटरी गुणधर्म असल्याने त्याचा परिणाम ॲक्नेच्या वाढीवर होतो. आणि पिंपल्स येण्याची समस्या आटोक्यात येते.

**पिंपल्सची वाढ कमी होते :** डाळिंबाचा गर त्वचेवर लावल्यास पिंपल्सवर परिणामकारक ठरतो. त्यामुळे कोणताही दुष्परिणाम होत नाही. तसंच त्यामुळे



पिंपल्समुळे त्वचा लालसर होण्याची समस्यादेखील दूर होते.

**बॅक्टरीयाची वाढ नियंत्रणात येते :** डाळिंबाचा गर चेहऱ्यावर लावल्याने ॲक्ने येण्यास कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टरीयांची वाढदेखील नियंत्रणात येते.

ॲक्नेवर अनेक घरगुती उपाय आहेत. परंतु, पिंपल्स आणि त्यामुळे होणारे त्वचेचे त्रास दूर करण्यासाठी डाळींब उपयुक्त ठरते. म्हणजेच डाळिंब हेल्दी असण्याबरोबर सौंदर्यवर्धकदेखील आहे. जाणून घेऊया पिंपल्स हटवण्यासाठी डाळिंबाचा कसा उपयोग होतो ?



**डाळिंबाचा वापर नेमका कसा करावा?**

डाळिंब हे चवीला चांगले असल्याने तुम्ही ते सोलून खाऊन शकता किंवा ज्यूस घेऊ शकता. डाळिंबाची साल आणि रस दोन्ही पिंपल्स कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतं. डाळिंबाची साल सुकवून त्याची पावडर करा. त्यात मध घालून पेस्ट बनवा आणि चेहऱ्यावर लावा. डाळिंबाचा रस चेहऱ्यावर लावल्याने देखील सारखाच फायदा होतो.

# 'सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातून पुढे आलेला असामान्य माणूस'; मुख्यमंत्री शिंदेंसाठी प्रवीण तरडेची खास पोस्ट



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा काल वाढदिवस होता. त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेकांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केल्या. अभिनेते आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी देखील सोशल मीडियावर खास व्हिडीओ शेअर करुन एकनाथ शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रवीण तरडे यांनी शेअर केलेल्या व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.

प्रवीण तरडेंनी शेअर केला व्हिडीओ

प्रवीण तरडे यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये एकनाथ शिंदे हे शेतीबद्दल बोलताना दिसत आहेत. तसेच व्हिडीओमध्ये मुख्यमंत्री शेतीची कामं देखील करताना दिसत आहेत. मुख्यमंत्र्यांचा व्हिडीओ शेअर करुन प्रवीण तरडे यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं, माननिय, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तुमच्या आमच्या सारख्या सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातून पुढे आलेल्या असामान्य माणसाला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा

प्रवीण तरडे यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

प्रवीण तरडेंचा आगामी चित्रपट

प्रवीण तरडे हे विविध फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतात. त्यांच्या आगामी चित्रपटांची देखील प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. लवकरच त्यांचा धर्मवीर-2 हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात प्रसाद ओक आणि क्षितीज दाते हे कलाकार प्रमुख भूमिका साकारणार आहेत.

# टीम इंडियाला लागले ग्रहण... कर्णधार रोहित टेन्शनमध्ये!




सुपरस्टार विराट कोहली संघात परतण्याची शक्यता कमी असताना, तसेच केएल राहुलबाबतीतही अनिश्चितता असताना भारताला आणखी एक धक्का बसला आहे. पाठीचे आणि मानेचे स्नायू आखडल्यामुळे श्रेयस अय्यर इंग्लंडविरुद्धच्या पुढच्या तिन्ही सामन्यात खेळण्याची शक्यता कमी आहे. विशाखापट्टण येथे झालेला दुसरा कसोटी सामना जिंकल्यानंतर पुढच्या तिन्ही कसोटींसाठी संघ निवड करण्यात आलेली नाही; तसेच तिसरा कसोटी सामना गुरुवारपासून सुरू होणार असल्यामुळे भारतीय खेळाडू आपापल्या घरी गेले आहेत.

एकापाठोपाठ एक खेळाडूला दुखापती होत असल्यामुळे संघनिवडही लांबली आहे. विराट कोहली आणि केएल राहुल संघात नसल्यामुळे मधल्या फळीची जबाबदारी श्रेयस अय्यरवर आहे; परंतु त्याला अपेक्षा पूर्ण करता आलेल्या नाहीत. दोन कसोटीत ३५, १३ आणि २७, २९ अशाच धावा करता आलेल्या आहेत. विराट आणि राहुल संघात असते, तर श्रेयसला अंतिम ११ खेळडूंत खेळण्याची संधी मिळली नसती.श्रेयस अनफिट ठरला, तर केएल राहुल तंदुरुस्त होऊन संघात परतणे भारतीय संघासाठी महत्त्वाचे असेल; अन्यथा मधली फळी एकदमच नवखी होईल. दुसऱ्या कसोटीत राहुलच्या ठिकाणी रजत पाटीदारला पदार्पणाची संधी मिळाली; परंतु त्याला फारसा प्रभाव पाडता आला नाही.

# उर्फीचा विचित्र ड्रेस पाहून ट्रोलर्सला आलं हसू



आपल्या अतरंगी स्टाईलमुळे सतत चर्चेत असणाऱ्या उर्फी जावेदच्या अनोख्या स्टाईलचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असतात. अनेकजण तिच्या हटके स्टाईलचं कौतुक करतात तर काहीजण तिला प्रचंड ट्रोल देखील करत असतात. मात्र, उर्फी कोणालाही न घाबरता सडेतोड उत्तर देताना दिसते. दरम्यान अशातच, उफीर्चा आणखी एक नवा लूक सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यामध्ये तिने गुलाबी रंगाचा विचित्र ड्रेस परिधान केला आहे. सतत चित्र-विचित्र लूक्समुळे चर्चेत असणाऱ्या उर्फी जावेदने पुन्हा एकदा अतरंगी लूक केला आहे. त्यामध्ये तिने गुलाबी रंगाचे त्रिकोणी कोन अंगाला लावले आहेत. शिवाय हा ड्रेस बॅकलेस आहे. उफीर्ला या लूकमध्ये पाहून अनेकजण तिची खिल्ली उडवत आहेत. तर काहीजण तिच्या फॅशन सेन्सचं कौतुक करत आहेत. उफीर्ने बिग बॉस ओटीटीमधून प्रसिद्धी मिळाली. उर्फी ही बिग बॉसमध्ये फार काळ नव्हती. पण, बिग बॉसमधून बाहेर पडल्यानंतर उफीर्ने वेगळ्या फॅशन सेन्सने सर्वांचे लक्ष वेधले. यानंतर उफीर्ला सोशल मीडियावर अल्पावधीत प्रसिद्धी मिळाली. नुकतेच उफीर्ने बिग बॉस ओटीटी 2 मध्ये पाहुणी म्हणून एंट्री घेतली होती.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | 6 | | | | 2 | | 9 |
| 5 | 7 | | 2 | | 6 | | | |
| | | 1 | | | 5 | | | 8 |
| 6 | | 3 | 4 | 8 | 1 | 7 | | |
| 7 | | | 5 | | | 3 | | |
| | | 5 | | | | | | |
| | 8 | 9 | | | | 4 | 3 | |
| | 6 | | | | | | | 1 |
| 3 | | 4 | | | | | 6 | 7 |

### उत्तर सुडोकू - ३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 4 | 9 | 3 | 8 | 2 | 7 | 6 |
| 6 | 7 | 9 | 1 | 4 | 2 | 8 | 3 | 5 |
| 8 | 2 | 3 | 7 | 5 | 6 | 4 | 9 | 1 |
| 4 | 8 | 5 | 2 | 7 | 9 | 6 | 1 | 3 |
| 7 | 3 | 1 | 6 | 8 | 4 | 5 | 2 | 9 |
| 9 | 6 | 2 | 3 | 1 | 5 | 7 | 8 | 4 |
| 5 | 1 | 6 | 8 | 2 | 3 | 9 | 4 | 7 |
| 2 | 9 | 7 | 4 | 6 | 1 | 3 | 5 | 8 |
| 3 | 4 | 8 | 5 | 9 | 7 | 1 | 6 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## भविष्य

**मेष** काही लोकांना आज काही साहसपूर्ण काम करण्याची उर्मी जागृत होईल. खोटं बोलणाऱ्यांपासून दूर राहा. विवाहित लोकांचे गुहस्थ जीवन आनंदी असेल.

**वृषभ** आजचा दिवस चांगला जाणार आहे. यावेळी अनोळखी लोकांसोबत कोणत्याही प्रकारे संपर्क ठेवू नका. विवाहित लोक आपल्या गृहस्थ जीवनाविषयी सकारात्मक असतील.

**मिथुन** आजचा दिवस प्रभावशाली होणार आहे. स्वतःच्या स्वाथापोटी कोणी व्यक्ती तुमच्या घरात समस्या निर्माण करण्याची शक्यता आहे. सावध राहा.

**कर्क** आजचा दिवस सामान्य राहणार आहे. स्वतःलाच काही आव्हाने देऊन तुम्ही इतरांसाठी एक प्रेरणादायक व्यक्ती बनाल. एखाद्या पाहुण्याच्या येण्याने वातावरण हलकंफुलकं होऊन जाईल.

**सिंह** आजचा दिवस महत्त्वाचा असेल. एखाद्या व्यक्तीपासून प्रेरणा घेऊन तुम्ही तुमच्या आयुष्यात काही बदल करू इच्छित असाल तर ते बदल आज होऊ शकतात.

**कन्या** लोकांचे मन आज ईश्वर आराधनेत लागेल. स्वतःला विकसित करण्यासाठी निसगार्साठी थोडी सतर्कता अंगीकारणे आवश्यक आहे. आपल्या जोडीदारासाठी अधिक काळजी घ्या.

**तुला** आजचा दिवस मध्यम फलदायक राहील. आज तुम्हाला आसपासच्या लोकांविषयी सहानुभूती वाटेल. जोडीदारासोबतच्या खाजगी क्षणांमध्ये त्यांच्याकडून प्रेमाचा वर्षाव होईल.

**वृश्चिक** त्याला कोणत्याच गोष्टीचा गर्व नाही आणि मानसिकरित्या सुद्धा स्वतंत्र आहे. पार्टनरला स्वतःकडे आकर्षित करण्यासाठी अजिबात दिखाऊपणा करू नका.


**धनु** आज उजेर्चा स्तर उत्तम असेल. सध्याच्या परिस्थितीत तुम्हाला चांगले नेतृत्व आणि अचूक निर्णय घेण्याची गरज आहे. तुमची एखादी जुनी चूक डोकं वर काढेल पण यासाठी घाबरण्याची गरज नाही.

**मकर** डोक्यात आज विचारांचे थैमान माजलेले असेल. तुम्हाला एका मागे एक शुभवार्ता समजत राहतील आणि जे काम होण्याची अपेक्षा आहे ते काम ही पूर्ण कराल.

**कुंभ** स्त्रियांची कपड्यांच्या बाबतीत आवड वाढेल. आज तुमचे आईवडील तुमच्या प्रत्येक कामात तुमची मदत करतील. जोडीदाराला एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**मीन** आज नाते संबंधांच्या बाबतीत दिवस भाग्यशाली राहील. तुमच्या समस्या सोडवताना तुमचे जोडीदार आणि कुटुंबियांची मदत नक्की घ्या.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)




# एलटीटी स्थानकात सात दिवसांचा मेगाब्लॉक; मेल- एक्सप्रेस गाड्यांचा

**■ठाणे। प्रतिनिधी,**
मध्य रेल्वेच्या लोकमान्य टिळक टर्मिनस येथील कोचिंग यार्डमध्ये पायभूत सुविधा उभारण्यासाठी आजपासून पुढील सात दिवस १८ फेबुवारी २०२४ पर्यंत दररोज मध्यरात्रीपासून ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे एलटीटी स्थानक येणाऱ्या आणि सुटणाऱ्या अनेक मेल- एक्सप्रेस गाड्यांचा वेळात बदल करण्यात आलेला आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) येथे कोचिंग सुविधा वाढवण्यासाठी मध्य रेल्वे ११/१२ फेब्रुवारी २०२४ (रविवार/सोमवार) ते १८ फेब्रुवारी २०२४ (रविवार/सोमवार) रात्रीपर्यंत ७ दिवस लोकमान्य टिळक टर्मिनस यार्डमध्ये मध्यरात्री ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉकर घेणार आहे. या ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक दररोज रात्री १०. ३० ते मध्य रात्री ३.३० वाजेपर्यत असणार आहे.

या ब्लॉकमुळे १२/१३ फेब्रुवारी २०२४ सोमवार/मंगळवारी ट्रेन क्रमांक 12141 लोकमान्य टिळक टर्मिनस- पाटलीपुत्र एक्स्प्रेस सोमवारी रात्री सुटणारी १३.०२.२०२४ (मंगळवार) रोजी ०४:३० वाजता पुनःनिर्धारित करण्यात आली आहे.

ट्रेन क्रमांक 22538 लोकमान्य टिळक टर्मिनस- गोरखपूर कुशीनगर एक्स्प्रेस ,ट्रेन क्रमांक 11061 लोकमान्य टिळक टर्मिनस- जयनगर एक्स्प्रेस या गाड्यांचा वेळपुनःनिर्धारित करण्यात आली आहे. ट्रेन क्रमांक 22847 विशाखापट्टणम- लोकमान्य टिळक टर्मिनसएक्स्प्रेस सोमवारी ठाणे येथे समाप्त करण्यात येणार आहे. तसेच १४/१५,१६, १७ फेब्रुवारी २०२४ एलटीटी स्थानकातून रात्री सुटणाऱ्या आणि एलटीटी स्थानकात येणाऱ्या अनेक मेल- एक्सप्रेस गाड्यांचा वेळात बदल करण्यात आलेला आहे.

# उल्हासनगरात शस्त्रांची झाडाझडती सुरू

## ६७४ जणांकडे अग्निशस्त्र असल्याची माहिती, शस्त्र बाळगणाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणार

**■ उल्हासनगर** : भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे कल्याण शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केल्यानंतर सर्वच यंत्रणा जागी झाली आहे.पोलिसांना आता सर्वच जणांच्या बंदुकींच्या परवान्यांची पडताळणी करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. या आदेशानुसार उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त डॉ. सुधाकर पठारे यांनी देखील युद्धपातळीवर परिमंडळ चार अंतर्गत येणाऱ्या उल्हासनगर, अंबरनाथ, आणि बदलापूर शहरात अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांची यादी आणि आढावा घेण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच तिन्ही शहरात एकुण ६७४ परवानाधारक अग्निशस्त्र आहेत. त्यामुळे या तिन्ही शहरातील अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांची पार्श्वभूमी आणि त्यांना शस्त्राची खरच आवश्यकता



■ उल्हासनगर :- २८५, अंबरनाथ :- १९९ आणि बदलापूर :- १९० जणांकडे परवानाधारक अग्निशस्त्र असल्याची माहिती पोलिसांनी दिली .तसेच अग्निशस्त्राच्या आकडेवारीसह इतर किती नवीन लोकांनी अग्निशस्त्र परवान्यासाठी अर्ज केला आहे . याचीही पडताळणी केली जाणार असून, ज्यांच्याकडे परवानाधारक अग्निशस्त्र आहे .

■ त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली जाणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे . तर नवीन अर्जदारांना अग्निशस्त्राची खरज गरज आहे का ? की केवळ शोभेसाठी आणि दहशतीसाठी अग्निशस्त्राची मागणी होत आहे, याबाबतचा अहवालही पोलिसांकडून वरिष्ठांना सादर केला जाणार आहे .

आहे का ? याची तपासणी केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

द्वारली येथील जमिनीच्या वादातून आमदार गणपत गायकवाड यांनी हिललाईन पोलीस ठाण्यात महेश गायकवाड यांच्यावर केलेल्या गोळीबाराच्या घटनेने राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. त्यात या घटनेच्या रोज नवनवीन चित्रफीत समोर येत असून मुख्य तीन आरोपींसह या घटनेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असलेल्या आरोपींचा गुन्हे अन्वेषण विभागाची पथके शोध घेत आहेत.

तर दुसरीकडे या गोळीबार घटनेच्या निमित्ताने जिल्ह्यातील अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांचा मुद्दा

◆ त्या परिमंडळ चारमधील उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या तिन्ही शहरांचा रक्तरंजित इतिहास पाहता, आता या घटने निमित्त तिन्ही शहरातील अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांचा आढावा घेण्याचे काम पोलिस उपायुक्त कार्यालयाने हाती घेतले आहे .त्यानुसार उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरात एकूण किती लोकांकडे परवानाधारक अग्निशस्त्र आहे याची माहिती घेण्याचे काम पोलिसांनी सुरु केले आहे . या शहरात एकूण ६७४ अग्नीशस्त्रे वापरात असल्याची माहिती परिमंडळ चारने गोळा केली आहे .

ऐरणीवर आला आहे. राजकीय दबाव आणि अर्थपूर्ण संबंधातून सरसकट अग्नीशस्त्र परवान्याच्या वाटपावरून गृह विभाग आणि पोलिस प्रशासनावर टीकेची झोड उडत आहे.

त्यामुळे गेल्या काही वर्षात जिल्ह्यात मोठया प्रमाणात राजकीय व्यक्ती, पदाधिकारी, बांधकाम व्यावसायिक यांनी अग्निशस्त्र परवाने आणि अग्निशस्त्र घेतल्याची माहिती आकडेवारीतून समोर येत आहे. त्यामुळे ज्या परिमंडळ चारमध्ये



ही घटना घडली.

## मुंबई महापालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षकांची मोठी भरती

# मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी अशा चार माध्यमांसाठी तब्बल १३४२ पदे भरण्यात येणार आहेत

**■ मुंबई** : शिक्षण विभागाने या पदभरतीची जाहिरात दिली आहे. राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलद्वारे महिन्याच्या अखेरपर्यंतही ही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती पालिकेने दिली. पालिका शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. मात्र असे असताना गेल्या काही वर्षात शिक्षकांची भरती झालेली नाही. प्राथमिक शाळेत शिक्षकांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने चार माध्यमांसाठी तब्बल १३४२ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही मोठी पदभरती होणार असून त्यासाठी जाहिरात दिली जाणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, तमिळ, तेलुगू, कन्नड, गुजराती अशा ८ भाषिक माध्यमांच्या शाळा चालवल्या जातात. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या सुमारे १,१२९ शाळांमध्ये मिळून सध्या ३ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कोरोना महामारीनंतर पालिका शाळांतील पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षण विभागाने केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. सीबीएसईच्या शाळा, अन्य बोर्डांच्या शाळा, शैक्षणिक वस्तू वाटप यामुळेही विद्यार्थी संख्या वाढली आहे.



सध्या शाळांतील पटसंख्या वाढली असताना शिक्षकांची पदे मात्र मागील काही वर्षापासून रिक्त आहेत. ही पदे भरली जात नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने चार माध्यमांसाठी मोठी भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण विभागाकडून यासाठी जाहिरात काढण्यात आली आहे. त्यामुळे फेब्रुवारी म्हणजे या महिन्याच्या अखेरपर्यंत पदभरतीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. दरम्यान पदभरतीत पवित्र पोर्टलवर नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांना संधी मिळणार आहे. शिक्षकांच्या जागा रिक्त असल्या तरी सध्या तासिका तत्वावर काही सेवानिवृत्त शिक्षकांची सेवा घेण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांची कमतरता भरून काढली आहे. परंतु, या भरतीमुळे कायमस्वरूपी शिक्षक मिळतील असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. भरतीची प्रक्रिया पालिकेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलद्वारे भरली जाणार आहेत. शिक्षण विभागाने आता याकरीता जाहिरात दिली आहे. पात्र उमेदवारांना १२ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर छाननी करून मग त्यांची यादी जाहीर केली जाणार आहे. पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत कागदपत्रांची पडताळणी करून मग त्यांना नियुक्ती पत्र दिले जाईल. फेब्रुवारी अखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होईल, असे शिक्षण विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

# उल्हासनगरात तरुणाच्या हत्येप्रकरणी सहा जणांना अटक

**■ उल्हासनगर** : उल्हासनगर कॅम्प क्र. ३ येथील इमलीपाडा परिसरात पहाटेच्या सुमारास राहुल जयस्वाल नावाच्या २५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. सात जणांनी मिळून ही हत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले होते. या प्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या पथकाने चोवीस तासांच्या आत विविध ठिकाणी धाडसत्र मोहीम राबवत सहा आरोपींना अटक केली. मात्र, या हत्या प्रकरणात सहभागी असलेला तडिपार आरोपी रॉबिन करोतिया हा आद्यपही फरार आहे.

मृत राहुल जयस्वाल याचे त्यात परिसरात राहणाऱ्या बाबू ढकणी आणि त्याच्या साथीदारांसोबत अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. या वादातून बाबू ढकणी याने काही वर्षांपूर्वी राहुल याची दुचाकीदेखील जाळली होती. या प्रकरणात पोलिसांनी बाबूला अटक केली होती. यामुळे दोघांमधील संघर्ष आणखीच वाढला होता. दरम्यान, गुरुवारी पहाटेच्या सुमारास बाबू ढकणी याच्यासह बसंत ढकणी, प्रणय शेट्टी, करण ढकणी, संतोष साळवे, प्रफुल कुमावत, रॉबिन करोतिया यांनी राहुलच्या घरावर दगडफेक केली. याबाबत मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी जात असताना आरोपींनी राहुल याला बेदम मारहाण केली, तसेच त्याच्या डोळ्यात मिरची स्प्रे आणि डोक्यात लादी घालून त्याची निर्घृण हत्या केली. या घटनेने संपूर्ण उल्हासनगर शहरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे, सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या वतीने विविध ठिकाणी धाडसत्र मोहीम राबवण्यात आली. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी बाबू ढकणी, बसंत ढकणी, प्रणय शेट्टी, संतोष साळवे, करण ढकणी, प्रफुल कुमावत या सहा आरोपीना अटक केली आहे. तसेच या प्रकरणातील आरोपी रॉबिन करोतिया हा अद्याप फरार असून, त्याला शोधण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# बालविवाहाचा प्रयत्न; नवरदेवासह ५ जणांवर गुन्हा

महाड : अल्पवयीन जोडप्याच्या प्रेमसंबंधातून मुलगी ५ महिन्यांची गर्भवती राहिल्याने दोन्ही कुटुंबाने दोघांचा बेकायदेशीररीत्या बालविवाह लावण्याचा प्रयत्न केल्याने नवरदेवासह आई-वडील, सासू-सासरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना घडली.

महाड तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचे आणि आदिवासीवाडी येथील अल्पवयीन मुलगा यांचे वर्षभरापासून प्रेमसंबंध होते. या कालावधीत ही मुलगी ५ महिन्यांची गर्भवती राहिली. ही बाब दोन्ही कडच्या मंडळींना कळाल्यानंतर त्यांनी बेकायदेशीररीत्या या दोघांचे लग्न लावून देण्याचा प्रयत्न केला. मात्र, महाडच्या महिला समुपदेशन केंद्राला याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत त्यांचा प्रयत्न हाणून पाडला.

या प्रकरणी महाड तालुका पोलीस ठाण्यात मुलीचे आई-वडील, सासू-सासरे आणि अल्पवयीन पती या पाच जणांविरोधात बालविवाह प्रतिबंधात्मक कायदा आणि बाललैंगिक अत्याचार संरक्षण कायदा पॉस्को अंतर्गत कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.

## कंटेनरला आगीत सहा बकऱ्यांचा मृत्यू

**■ मुंब्राः** रेतीबंदर येथील विसर्जन घाटाजवळ असलेल्या केबीन कंटेनरला लागलेल्या आगीत कंटेनरमध्ये ठेवण्यात आलेल्या ६ बकऱ्यांचा जळून मृत्यू झाला. शुक्रवारी पहाटे ही दुर्घटना घडली. रेतीबंदर गणपती विसर्जन घाट येथे अन्वर कच्छी यांच्या कंटेनरला आग लागली. घटनास्थळी कळवा पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान, फायर वाहनासह, हायराईज फायर वाहन व रेस्क्यू वाहनासह व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी पिकअप वाहनासह उपस्थित होते. कंटेनरमध्ये राहणारे निर्मल महातो हा कामगार आग लागताच खबरदारीचा उपाय म्हणून बाहेर आला. त्यामुळे बचावला. घटनास्थळी केबीन कंटेनरमध्ये पाळण्यात आलेल्या ६ बकऱ्या, ३ कमर्शियल सिलेंडर, ५ किलो वजनाचा एक छोटा सिलेंडर जळाला.

## जॉबच्या आमिषाने १२ लाखांची फसवणूक

**■ मुंब्राः** पार्ट टाईम जॉबच्या आमिषाने १२ लाख ६९ हजार २०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत कळवा पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारेगाव येथे राहणाऱ्या अजित बांगरना अनोळखी मोबाईलधारक व्यक्तीने व्हॉट्स ॲप व टेलिग्रामवर पार्ट टाईम जॉबकरता मॅसेज केला. कामाची निश्चिती करण्यासाठी कामाचे पैसे देण्याकरता मार्केट प्लेस ट्रेडींग लिंक पाठवली. तसेच अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवले. यादरम्यान आरोपीने फिर्यादीकडून १२ लाख ६९ हजार २०० रूपये रक्कम ऑनलाईन त्यांची आर्थिक फसवणूक केली.याबाबत फिर्यादी बांगर यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

## साकडबाव जवळ बसचा अपघात

**■ शहापूरः** राज्य परिवहन महामंडळाच्या शहापूर आगाराच्या बसला साकडबाव गावाजवळ अपघात झाला असून बसमधील ६९ प्रवासी हात, पाय आणि डोक्यावर मार लागून किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर शहापूर उपजिल्हा



रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. साकडबाव गावातून प्रवासी घेऊन शहापूरकडे निघालेल्या बसचे ब्रेक निकामी झाले तसेच स्टेरिंगही बंदीस्त झाल्याने अखेरीस चालक सुनील घुले यांनी प्रसंगावधान राखत बसची रस्त्यालगतच्या झाडाला धडक दिली.

## बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्यांवर येणार गंडांतर

**■ मुंबई** : अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व पोलीस ठाण्यांतील प्रमुखांना बेकायदा पिस्तुल बाळगणाऱ्यांवर कारवाईसोबत परवानाधारक शस्त्र परवाने तपासण्याचे आदेश दिले.

राजकीय व्यक्ती आणि त्यांच्याशी संबंधित लोकांचे असलेले वाद पूर्ववैमनस्य याची माहिती घेण्यासोबतच त्यांच्या सध्याच्या घडामोडींवर लक्ष ठेवण्याचे तोंडी आदेश देण्यात आलेले आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यातील 'मिल्स स्पेशल'वर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मुंबईत सुमारे ११ हजार ५०० जणांकडे शस्त्र परवाने असल्याची नोंद पोलीस दप्तरी आहे.

अनेक सुरक्षा रक्षक स्वतःकडे परराज्यातील बेकायदा शस्त्र परवाने बाळगत आहेत. त्यातील अनेकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत आहेत. त्यांचे शस्त्र आणि परवाने जप्त करून कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

# पेशा गावानुसार सामुदायिक लग्न सोहळा घेण्याचा निर्णय

## लग्नाचा खर्च वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी उचलले पाउल

**■ जव्हार** : दिवसेंदिवस लग्न कार्य धुमधडाक्यात करण्याच्या नादात ग्रामीण भागातील कुटुंबे अजून कर्जबाजारी होत आहेत. सर्व लग्नाची उसनवारी आणि नाहक कर्जाचा बोजा वाचविण्याकरता जव्हार तालुक्यातील पिंपळशेत (खरोंडा) ग्रामपंचायतील ग्रामस्थांनी पेशा गावानुसार सामुदायिक लग्न सोहळा घेण्याचा निर्णय ग्राम सभेत घेतला आहे.

ग्रामीण भागात लग्न कार्याचा अधिक खर्च करून ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट होत आहे. लग्न धूमधडाक्यात करण्याच्या नादात ग्रामीण आदिवासी भागातील



माणूस अजून अधिक कर्ज बाजारी बनत चालला आहे.या लग्न कार्यात नाहक अधिक खर्च टाळण्याकरिता एका पेसा गावाचे दोन, तिने पाडे असतील

> ग्रामीण भागात आदिवासीवस्ती असल्याने येथील ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे . लग्न कार्यात नाहक कर्ज काढून लग्न करणे, यामुळे या भागातील गरीब कुटुंब अजून विकासापासून दूर आहे . यामुळे आम्ही ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी यांनी सामुदायिक लग्न प्रत्येक पेसा मधून केला जाईल असे ग्रामसभेमध्ये ठरविण्यात आले आहे . येणाऱ्या १ मे २०२४ पासून विवाह होण्याकरता ग्रामपंचायतीकडून नाव नोंदणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
> **– दिनेश जाधव . सरपंच, पिंपळशेत (खरोंडा)**

तर तेथील ग्रामस्थांनी एकच वार, तारीख ठरवून सामुदायिक लग्न करण्याचा ऐतिहासिक निर्णय जव्हार तालुक्यातील पिंपळशेत (खरोंडा) ग्रामपंचायतील ग्रामस्थांनी नुकताच झालेल्या ग्रामसभेत निर्णय घेतला आहे.जव्हार तालुक्यातील पिंपळशेत (खरोंडा) ग्रामपंचायत हद्दीत एकूण १४ गावं-पाडे आणि ३ पेसा गावं आहेत. एकूण कुटूंबे एकूण ३ हजार ३०० कुटुंबे वास्तव्य करत आहेत. या वर्षापासून ग्रामपंचायत हद्दीत पेसा गावानुसार तीन वेळा सामुदायिक विवाह सोहळा होईल असा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. यामध्ये तारीख, वार, वेळ हे ग्रामस्थ काढतील त्या नुसार लग्न जमविण्याऱ्या कुटुंबाने लग्न तयारी करून वधू, वराची नोंद करणे, एकच मंडप, एक जेवण दारू बंद, मानपान बंद सामुदायिक विवाह सोहळ्यामुळे लग्न करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाचा नाहक, वायफळ खर्च वाचवण्याकरता निर्णय घेतल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.पेशा गावानुसार सामुदायिक लग्न सोहळा घेण्याचा ऐतिहासिक निर्णयाची चर्चा आहे.

## बॅगेतून दागिन्यांची चोरी

**■ नवीन पनवेल** : ट्रेनने प्रवास करत असताना पुणे रेल्वे स्टेशन ते लोणावळा रेल्वे स्टेशनदरम्यान चार अनोळखी व्यक्तींनी बॅगेतील दीड लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर सुब्बाराव वटलमणी हे पळस्पे फाटा येथे राहतात. ते पत्नी व दोन मुलांसह पनवेल येथे येण्याकरता लोकमान्य टिळक ट्रेनने प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांनी आपले सोन्या-चांदीचे दागिने बॅगेमध्ये ठेवले होते. यावेळी पुणे रेल्वे स्टेशन येथे चार अनोळखी व्यक्ती डब्यामध्ये चढले. यावेळी त्यांनी बॅगेतून दागिन्यांची चोरी केल्याची तक्रार वटलमणी यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# शिष्यवृत्तीसंदर्भातील 'ती' जाचक अट शिथिल

## नवी मुंबई पालिकेच्या समाजविकास विभागाचा निर्णय

**■ नवी मुंबई** : आर्थिक दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य मिळावे, यासाठी महापालिकेकडून दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते, परंतु यंदा शिष्यवृत्तीसाठी ८० टक्के गुणांची अट घालण्यात आली होती. या जाचक अटींमुळे हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असते. त्यामुळे या विरोधात विविध घटकांनी आवाज उठवला होता. 'पुण्यनगरी'नेही या संदर्भात वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत नवी मुंबई महापालिकेने ८० टक्के गुणांची अट रद्द करून दरवर्षीप्रमाणे असलेल्या ६५ टक्क्यांच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे.

नवी मुंबईतील आर्थिक



### इतकी मिळणार शिष्यवृत्ती

इयत्ता पहिली ते चौथी : ४ हजार रुपये
पाचव ते सातवी : ६ हजार रुपये
आठवी ते दहावी : ८ हजार
अकरावी ते बारावी : ९,६०० रुपये.
पदवी : १२ हजार रुपये

दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसंबंधी ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी पालिकेकडून आदेश दिले गेले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी ६५ टक्के गुणांची अट होती. परंतु यंदा पालिकेच्या समाजविकास विभागाने त्यात बदल करत ८० टक्के गुणांची अट ठेवली. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये कमालीचा असंतोष पसरला होता. ८० टक्के गुणांच्या

> मागील वर्षी शिष्यवृत्ती देताना ६५ टक्क्यांची जी अट ठेवली होती तीच या वर्षीही ठेवण्यात आली आहे .
> **–किसनराव पालांडे, उपायुक्त, समाज विकास विभाग, पालिका.**

अटीमुळे सर्वात मोठा तोटा आर्थिक दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना होणार होता. या निर्णयाने हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार होते. या अटीविरोधात मनपा मुख्यालय स्तरावर विविध घटकांनी आवाज उठवला. मागील वर्षाप्रमाणेच ६५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी आवाज उठवला. पालिकेने त्याची दखल घेत ८० टक्के गुणांची अट शिथिल केल्याने आता किमान ६५ टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### अर्ज भरण्याचा कालावधी वाढवावा

शिष्यवृत्ती योजनेसंबंधी अर्ज ऑनलाईन भरण्यास ८ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली, तर अंतिम मुदत २८ फेब्रुवारी आहे . फक्त मोजून वीस दिवस शिल्लक आहेत . या वीस दिवसात अर्ज सादर करणे शक्य होणार नाही . त्यामुळे पालिकेने विचार करून अर्ज सादरीकरणाच्या मुदतीत वाढ करून किमान १५ मार्चपर्यंत कालावधी वाढवावा, अशी मागणी पालक करत आहेत .

> टक्केवारीप्रकरणी जी जाचक अट ठेवली होती ती रद्द करावी म्हणून त्या संदर्भात आयुक्तांना निवेदन सादर केले होते . आयुक्तांनीही सतर्कता दाखवत ८० टक्के गुणांची अट रद्द केली . तसेच दैनिक पुण्यनगरीनेही यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध केले होते .
> **विनोद पोखरकर, समन्वयक, सकल मराठा समाज, नवी मुंबई.**

## साताऱ्यात दहशतवादी वावरत असल्याचा मुंबई पोलिसांना आला फोन

**■ भिवंडीः** साताऱ्यात दहशतवादी वावरत असल्याचा दूरध्वनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला शुक्रवारी मध्यरात्री प्राप्त झाल्याची माहिती मिळत आहे. याप्रकरणानंतर सर्वच तपास यंत्रणा कामाला लागली. दूरध्वनी करणाऱ्याच शोध घेत मुंबईतील टिळक नगर परिसरातून शनिवारी आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीची मानसिक स्थिती बिघडल्यामुळे त्याने गुन्हा केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.यापूर्वी गुरुवारी कुलाबा येथील हॉटेल ताजमध्ये 10 ते 11 पाकिस्तानी दहशतवादी शिरल्याचा दूरध्वनी मुंबई पोलिसांना प्राप्त झाली होती. साताऱ्यात काही दहशतवादी आले असून खूप मोठी कारवाई करण्याची त्यांची तयारी असल्याचा दूरध्वनी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला शुक्रवारी मध्यरात्री प्राप्त झाला. दहशतवाद्यांच्या माहितीमुळे सर्वच यंत्रणा कामाला लागली. पोलिसांनी तातडीने गुन्हे शाखा व इतर तपास यंत्रणांना याबाबतची माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांकडून तपास सुरू करत दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीची माहिती मिळविण्यात आली. दूरध्वनी करणाऱ्याला ताब्यात घेऊन टिळक नगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. पोलिसांनी संशयीताची चौकशी केली असून त्याच्या नातेवाईकांशीही संपर्क साधण्यात आला होता. सात वर्षांपूर्वी संशयीत व्यक्तीच्या पत्नीचे निधन झाले असून तेव्हापासून त्यांची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे संशयीत व्यक्तीच्या जावयाने पोलिसांना सांगितले. संशयीत व्यक्ती मुंबईमध्ये बहिणीकडे वास्तव्याला आहे.